# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ०५/०७/२०२४

# प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिका आणि शक्ति वेलफेअर फाउंडेशन यांच्या वतीने थॅलेसीमिया ग्रस्त रुग्णांच्या समस्यांवर आधारित सिंधी चित्रपट "नई शुरूवात" च्या स्क्रीनिंगचे ३० जून रोजी सकाळी महापालिका प्रशासक तथा आयुक्त डॉ. अझीझ शेख, आमदार कुमार आयलानी, डॉ. सुभाष जाधव व झुलेलाल मंदिराचे गादिसर भाऊ लीलारामजी, महाराष्ट्र सिंधी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष महेश सुखरामानी, उल्हासनगर भाजपा अध्यक्ष प्रदीप रामचंदानी, माजी नगरसेवक राजू जग्यासी, महापालिकेतील मालमत्ता विभागाच्या व्यवस्थापक अलका पवार यांच्या उपस्थितीत महापालिकेचे सिंधू भवन, सपना गार्डन, उल्हासनगर-३ येथे उद्घाटन करण्यात आले असून, सदर सिनेमाचा प्रथम शो या ठिकाणी संपन्न झाला.

या चित्रपटाच्या उद्घाटन प्रसंगी "तारक मेहता का उल्टा चष्मा" चे आत्माराम तुकाराम भिडे अर्थात मंदार चांदवडकर आणि मराठी फिल्म अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला अधिक रंगत आली. त्यांनी चित्रपटाच्या स्क्रिनिंग प्रसंगी शुभेच्छा व्यक्त करून काजल मुलचंदानी यांच्या कार्याचे कौतुक केले. दिनांक ०४ जुलै, २०२४ पर्यंत दुपारी ३ व सायंकाळी ६ वाजता सदर सिनेमाचे रोज दोन शो चालविण्यात आले आहे. थॅलेसिमिया या आजारा सोबत कसे लढायचे हे चित्रपटामध्ये दाखविण्यात आले आहे.

दिनांक ०४ जुलै, २०२४ रोजी महापालिका प्रशासक तथा आयुक्त डॉ. अझीझ शेख यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांसह हा चित्रपट स्वत: सिंधुभवन येथे पाहिला व त्यांनी या चित्रपटास नागरिकांचा उत्सफूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे पाहून सदर चित्रपटाचे प्रदर्शन आणखी २ दिवस वाढविण्याचे जाहीर केले. यासाठी काजल मुलचंदानी आणि त्यांच्या टीमने महापालिका आयुक्त डॉ. अझीझ शेख यांचे आभार मानले.

(छाया प्रकाश डोंगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत :- माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत :- योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम अॅनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.